## ७ खेळ आणि इतिहास

मनोरंजन व शारीरिक व्यायाम यासाठी केली जाणारी कोणतीही कृती म्हणजे खेळ. खेळांचा इतिहास माणसांएवढा जुना आहे कारण खेळणे ही त्याची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. उदाहरणार्थ: खेळातून शिकार, उदरनिर्वाह, खेळ व मनोरंजन होई. जसे-द्यूत, कुस्ती, रथांच्या शर्यती, बुद्धिबळ.

खेळाचे महत्त्व :- १. जीवनातील चिंता, व्यथा व्यक्त करता येतात.

२. मनाला विरंगुळा मिळतो. मन ताजेतवाने होते .

३. खेळाडूचा व्यायाम होतो.

४. शरीर बळकट व काटक बनण्यास मदत होते .

५. मनोधैर्य, चिकाटी, खिलाडूपणा इत्यादी गुणांमध्ये वाढ होते.

6) सांघिक खेळामुळे सहकार्य, संघभावना वाढीस लागते. नेतृत्व गुणांचा विकास.

खेळाचे प्रकार :- १. बैठे खेळ २. मैदानी खेळ

बैठे खेळ :- बैठे खेळ म्हणजे बसून खेळायचे खेळ. उदाहरणार्थ:- पत्ते, सोंगट्या हे खेळ कोठेही बसून खेळता येतात.

मैदानी खेळ :- १.देशी खेळ :- खो- खो, लंगडी, कबड्डी, आट्या- पाट्या, विटीदांडू, गोट्या इत्यादी.

२. विदेशी खेळ :- बॅडमिंटन, टेबल टेनिस, हॉकी, क्रिकेट, फुटबॉल, गोल्फ, पोलो इत्यादी .

मैदानी खेळांमध्ये धावण्याच्या शर्यती जगभर होतात. मॅरेथॉन व अडथळ्यांच्या शर्यती. शारीरिक कौशल्यावर आधारित मैदानी खेळांमध्ये गोळाफेक, थाळीफेक, लांब उडी, उंच उडी, पोहण्याच्या शर्यती, नौकानयन, मल्लखांब, जिम्नॅस्टिक्स यातून कौशल्य दिसतात.

साहसी खेळात स्केटिंग, आईस हॉकी, प्रस्तरारोहण, ग्लायडिंग, मोटरसायकल, मोटार कारचा समावेश होतो.

**खेळांचे आंतरराष्ट्रीयकरण :**

सध्या खेळाचे आंतरराष्ट्रीयकरण झाले आहे. ऑलिंपिक, एशियाड, विंबल्डन इत्यादी. विविध खेळांच्या सामन्यांचे प्रक्षेपण  दूरदर्शन वरून जगभर एकाच वेळी केले जाते. जगभरातील सर्वच प्रेक्षक याचा  आनंद लुटतात. हौशी खेळाडू शिकण्यासाठी, प्रेक्षक मनोरंजनासाठी, कंपन्या जाहिरीतीसाठी सामन्यांकडे पाहतात.  निवृत्त खेळाडू, सामने समजावून सांगण्यासाठी येतात. त्यामुळे खेळाचे अर्थकारण बदलून गेले आहे.

*** खेळांचे साहित्य व खेळणी:** लहान  मुलांच्या करमणुकीसाठी, शिक्षणासाठी जी विविध रंगीबेरंगी विविध साधने व उपकरणे असतात त्यांना खेळणी म्हणतात.

***खेळणी आणि इतिहास:**

खेळण्यांमधून इतिहास, तंत्रज्ञानाची प्रगती, धार्मिक-सांस्कृतिक परंपरा समजतात. उत्खननातील खेळण्यांवरून प्राचीन काळातील विविध देशांचा संबंध समजतो.

***खेळ आणि संबंधित साहित्य व चित्रपट:**

खेळाशी संबंधित साहित्य, पुस्तके, कोश तयार होत आहेत.  उदा. षटकार. खेळ व खेळाडूचा जीवनपट यावर हिंदी आणि इंग्रजी चित्रपट निघाले आहेत. उदा. मेरी कॉम, दंगल इत्यादी. चित्रपट बनवताना चित्रपटाचा कालखंड तत्कालीन भाषा पद्धत, जनजीवन इत्यादींचा सखोल अभ्यास करावा लागतो.   इतिहासाचे विद्यार्थी हा अभ्यास करू शकतात.   क्रीडा या विषयावर  लिहताना खेळाचा इतिहास माहीत हवा.

***खेळ आणि व्यावसायिक संधी:**

खेळ व इतिहास यांचा जवळचा संबंध आहे.   इतिहासाच्या विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात अनेक संधी आहेत.

**खेळाच्या स्पर्धा** :-आलिंपिक,  एशियाड,  क्रिकेट, विश्वचषक स्पर्धा,  हॉकी,  कुस्ती,  बुद्धिबळ इत्यादी खेळांच्या स्पर्धा जागतिक पातळीवर खेळल्या जातात.  हॉकी हा भारताचा राष्ट्रीय खेळ आहे.  खेळाडूं खेळात करिअर करु शकतात.

स्पर्धांच्या संदर्भातील लेखन, समीक्षा करण्यासाठी इतिहासाच्या जाणकारांची मदत घ्यावी लागते. खेळांच्या स्पर्धा चालू असताना, त्यासंबंधी निवेदन करण्यासाठी तज्ञांची आवश्यकता असते.  त्यासाठी त्यांना खेळाचा संपूर्ण इतिहास माहिती असणे गरजेचे असते. उदा. खेळातील विक्रम, गाजलेले खेळाडू, आकडेवारी, दूरदर्शन वरून प्रत्यक्ष सामन्याचे प्रक्षेपण चालू असते. खेळाशी इतर संबंधित वाहिन्या २४ तास सुरू असतात. त्यामुळे या क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत.

खेळाच्या स्पर्धा मध्ये पंचाची आवश्यकता असते . पंच म्हणून पात्रता प्राप्त करण्यासाठी परीक्षा असतात. पात्रता प्राप्त झालेल्या पंचाना वेगवेगळ्या स्तरांवर काम करण्याची संधी मिळते. खेळाडूंसाठी शिष्यवृत्ती देण्यात येते .सरकारी व खाजगीस संस्था मध्ये खेळाडूंसाठी राखीव जागा ठेवण्यात येतात